# माळीण दुर्घटनाग्रस्तांसाठी दोडामार्ग महाविद्यालयाची मदतफेरी

दोडामार्ग : वार्ताहर

येथील नवनिर्माण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने माळीण दुर्घटनाग्रस्तांसाठी निधी संकलित करण्यात आला. या विभागाच्या विद्यार्थ्यांनीरविवारीदोडामार्गबाजारपेठ व गावात मदत फेरी काढली. या मदत फेरीला व्यापारी व नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक ग्रामस्थ व व्यापाऱ्यांबरोबरच फिरते विक्रेते, वाहनचालक, ग्राहक, प्रवासी, कामगार आदी सर्वच घटकांनी माळीण दुर्घटनाग्रस्तांसाठी यथाशक्ती



दोडामार्ग : महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढलेली मदतफेरी. (छाया : रत्नदीप गवस)

आर्थिक मदत या विद्यार्थ्यांकडे सुपूर्द केली. महाविद्यालयाचे सेवा योजना विभागप्रमुख डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. आर. ए. मोरे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. डॉ. गथाडे, प्रा. जाधव, प्रा. बेग, प्रा. पाडगावकर आदींसह सेवा योजना विभागाचे सर्व विद्यार्थी या मदत फेरीत सहभागी झाले होते.